RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष १२, अंक १२] गुरुवार, जानेवारी २२, २०२६/माघ २, शके १९४७ [पृष्ठे २३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ३३**

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### गृहनिर्माण विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २२ जानेवारी, २०२६.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६.**

क्रमांक सेप्रनि-२०२०/प्र.क्र.८८/गृनिभू.—महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (१९७७ चा महा. २८) यांच्या कलम १८४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (एक) आणि कलम १९ च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच त्याबाबतीत समर्थ करणाऱ्या सर्व इतर अधिकारांचा वापर करून व याबाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश यांचे अधिक्रमण करून महाराष्ट्र शासन याद्वारे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील वरिष्ठ लिपिक या पदावरील सेवा प्रवेश विनियमित करणारे पुढील नियम करीत आहे, या कायद्याच्या कलम १८४ च्या उप कलम (३) द्वारे आवश्यकतेनुसार महाराष्ट्र शासनाने नियमाचा खालील मसुदा तयार करण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. त्यामुळे प्रभावित होण्याची शक्यता असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीसाठी सदर मसुदा प्रकाशित करण्यात येत आहे; आणि याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, सदर मसुदा २९ जानेवारी २०२६ या तारखेला किंवा त्यानंतर महाराष्ट्र शासन विचारात घेईल.

२. उपरोक्त तारखेपूर्वी सदर मसुदा नियमांबाबत कोणत्याही व्यक्तीकडून अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२ यांना प्राप्त होणारे आक्षेप किंवा सूचना शासनास योग्य वाटल्यास विचारात घेतल्या जातील.

**सेवा प्रवेश नियमाचे प्रारूप**

१. या नियमांना, महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्रविकास प्राधिकरणातील वरिष्ठ लिपिक (सेवाप्रवेश) नियम, २०२६ असे म्हणावे.

२. नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,

(अ) "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन असा आहे.

(ब) "विभाग" याचा अर्थ महाराष्ट्र शासनाचा गृहनिर्माण विभाग असा आहे.

(क) "प्राधिकरण" म्हणजे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महा. २८) याच्या कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण.

(ड) "पदवी" याचा अर्थ सांविधानिक विद्यापीठाची कोणत्याही शाखेतील किंवा शासनाने त्याच्याशी समतुल्य म्हणून घोषित केलेली अन्य कोणतीही अर्हता.

(ई) "पदोन्नतीसाठी पात्रता" म्हणजे शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले नियम किंवा आदेशाव्दारे निर्दिष्ट केलेल्या अटी आणि शर्ती नुसार पदोन्नतीसाठी पात्रता.

३. प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील वरिष्ठ लिपिक या पदावरील नियुक्ती प्राधिकरणामध्ये पुढील मार्गाने करण्यात येईल :—

(अ) पुढील उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे ;

(एक) वयोमर्यादा :-ज्या उमेदवाराचे वय १९ वर्षापेक्षा कमी नसेल, आणि खुल्या वर्गातील उमेदवारासाठी ३८ वर्षापेक्षा जास्त नसेल व मागासवर्गीय व्यक्तींसाठी ४३ वर्षापेक्षा जास्त नसेल; आणि

(दोन) ज्या उमेदवाराने पदवी धारण केली आहे; आणि

(तीन) ज्यांनी मराठी टंकलेखनाचे किमान ३० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे किंवा इंग्रजी टंकलेखनाचे किमान ४० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र किंवा संगणक टंकलेखनाचे प्रमाणपत्र धारण केले आहे ;

(चार) ज्यांना प्रशासकीय कामाचा ३ वर्षापेक्षा कमी नसेल, इतका अनुभव आहे.

किंवा

(ब) प्राधिकरणाच्या आस्थापनेवर कनिष्ठ लिपिक हे पद धारण करणाऱ्या ज्या कर्मचाऱ्याने किमान ३ वर्षाची नियमित सेवा पूर्ण केलेल्या व्यक्तींमधून पात्रता व सेवा ज्येष्ठतेच्या आधारे या निकषावर योग्य अशा व्यक्तीस पदोन्नती देऊन;

४. नियम ३ येथे नमूद पदावर पदोन्नती व नामनिर्देशनाने करावयाची नियुक्ती यांचे प्रमाण ८०:२० असे राहील.

५. नियम ३ येथे नमूद पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार, विभागीय परीक्षा (आवश्यक असल्यास), उत्तीर्ण केली नसेल किंवा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून त्या व्यक्तीला सूट मिळाली नसेल तर, त्या व्यक्तीने सदर परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

६. नियम ३ येथे नमूद पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार, हिंदी व मराठी भाषा परीक्षा, अगोदरच उत्तीर्ण केलेल्या नसतील किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून त्या व्यक्तीला सूट मिळाली नसेल, तर त्या व्यक्तीने सदर परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील.

७. नियम ३ येथे नमूद पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक संचलन प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

८. लहान कुटुंबाची घोषणा :-

(एक) नियम ३ येथे नमूद पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंब घोषणा) नियम, २००५ किंवा शासनाने वेळोवेळी केलेल्या इतर कोणतेही नियम, आदेश किंवा कोणत्याही दस्तऐवजानुसार लहान कुटुंबाची घोषणा करणे आवश्यक राहील.

(दोन) ज्या व्यक्तीला लहान कुटुंबाची घोषणा करतांना दोन पेक्षा जास्त अपत्य असतील अशी व्यक्ती नियुक्तीस अपात्र ठरविण्यात येईल.

(तीन) एखाद्या व्यक्तीची सेवेत नियुक्ती झाल्यानंतर नियुक्तीच्या वेळी किंवा नियुक्ती झाल्यानंतर त्याला दोन पेक्षा जास्त अपत्य असल्याचे सिध्द झाल्यास, तो सदर पदावर राहण्यास अपात्र ठरेल.

९. नियम ३ येथे नमूद पदावर नियुक्त झालेला व्यक्ती प्राधिकरणाच्या अधिपत्याखालील, महाराष्ट्र राज्यात कोणत्याही मंडळात/कार्यालयात, बदलीस पात्र राहील.

१०. नियम ३ येथे नमूद पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीला प्राधिकरणाच्या सेवेत नियुक्तीनंतर शासनाने वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या अटी आणि शर्ती लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अजित कवडे,**
शासनाचे उप सचिव.

## HOUSING DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 22nd January 2026.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA HOUSING AND AREA DEVELOPMENT ACT, 1976.

No.SEPRANI-2020/C.R.88/GRUNIBHU.—The following draft of rules which the Government of Maharashtra proposes to make in exercise of the powers conferred by clause (*i*) of sub-section (*2*) of section 184 read with sub-section (*5*) of section 19 of the Maharashtra Housing and Area Development Act, 1976 (Mah. XXVIII of 1977), and of all other powers enabling it in that behalf, and in supersession of all the existing rules, notifications, orders or any other instruments issued in this behalf to regulate recruitment to the post of Senior Clerk on the establishment of the Maharashtra Housing and Area Development Authority, is hereby published, as required by sub-section (*3*) of section 184 of the said Act, for the information of all the persons likely to be affected thereby; and a notice is hereby given that the said draft will be taken into consideration by the Government of Maharashtra on or after the 29th of January 2025.

2. Any objection or suggestions, which may be received by the Additional Chief Secretary, Housing Department, Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mumbai 400 032, from any person with respect to the said draft rules before the aforesaid date, will be considered by the Government.

## DRAFT RULES

1. These rules may be called the Senior Clerk, Maharashtra Housing and Area Development Authority (Recruitment) Rules, 2026.

2. In these rules, unless the context requires otherwise,—

(*a*) "Authority" means the Maharashtra Housing and Area Development Authority established under section 3 of Maharashtra Housing and Area Development Act, 1976 (Mah. XXVIII of 1977);

(*b*) "Department" means Housing Department of Government of Maharashtra;

(*c*) "Degree" means a degree of any discipline of a statutory university or any other qualification declared by the Government to be equivalent thereto;

(*d*) "Eligibility for promotion" means the eligibility for promotion in accordance with the terms and conditions specified for promotion in rules, resolutions or orders issued by the General Administration Department, from time to time;

(*e*) "Government" means the Government of Maharashtra;

3. Appointment to the post of Senior Clerk on the establishment of the Authority, shall be made,—

(1) by nomination from amongst the candidates who fulfils the following criteria, namely :—

(*i*) *Age limit.*—

(*A*) Lower Age Limit.—Nineteen years of age completed as on the last date of receipt of applications as per advertisement for recruitment to the said post.

(*B*) Upper Age Limit.—Does not exceed thirty-eight years of age for the persons not belonging to reserved categories and forty-three years of age for the persons belonging to reserved categories as on the last date of receipt of application as per advertisement for recruitment to the said post.

(*ii*) (*a*) Minimum Educational Qualification.—A person holding a degree from a recognized university; and

(*b*) A person holding a Government Commercial Certificate or Computer Typing Certificate with a typing speed of at least thirty words per minute in Marathi or with typing speed of at least forty words per minute in English.

(*iii*) *Experience.*—A person holding not less than three years of experience in administrative work in the Government or Semi-Government Office or Government Undertakings or Company or Firm.

(2) by promotion of a suitable person having eligibility for promotion, on the basis of seniority, from amongst the persons holding the post of Junior Clerk-Typist on the establishment of the Authority, having not less than three years of regular and continuous service on that post.

4. The appointment to the post mentioned in rule 3 by promotion and nomination shall be made in the ratio of 80:20.

5. A person before being appointed to the post mentioned in rule 3 shall be required to pass the Departmental Examination conducted by the Authority if any, unless he has been exempted from passing the same.

6. A person appointed to post mentioned in rule 3 shall pass the Marathi and Hindi languages examinations as per the rules made in that behalf by the Government, from time to time, unless he has already passed or has been exempted from passing those examinations.

7. A person appointed to the post mentioned in rule 3 shall possess Certificate of Computer Operation prescribed by rules or orders issued in that behalf by the Government, from time to time.

8. (*1*) A person appointed to post mentioned in rule 3 by nomination shall submit a declaration of Small Family as per the provisions of the Maharashtra Civil Services (Declaration of Small Family) Rules, 2005 or any other rules, orders or any instruments issued in this behalf by the Government, from time to time.

(*2*) A person having more than two children on the date of submission of Declaration of Small Family shall be disqualified for the appointment in service.

(*3*) After appointment of a person in the service, if it is proved that he has more than two children at the time of appointment or thereafter, then he shall be disqualified for continuing on the said post in service.

9. A person appointed to the post mentioned in rule 3 shall be liable to be transferred to any of the Board Office within the jurisdiction of the Authority in the State of Maharashtra.

10. The terms and conditions specified by the Government, from time to time, shall apply to the person appointed to the post mentioned in rule 3 after his appointment in the service of the Authority.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

AJIT KAWADE,
Deputy Secretary to Government.

## गृहनिर्माण विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २२ जानेवारी, २०२६.

### अधिसूचना

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६.**

क्रमांक सेप्रनि-२०२०/प्र.क्र.८८/गृनिभू.—महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (१९७७ चा महा. २८) यांच्या कलम १८४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (एक) आणि कलम १९ च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच त्याबाबतीत समर्थ करणाऱ्या सर्व इतर अधिकारांचा वापर करून व याबाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश यांचे अधिक्रमण करून महाराष्ट्र शासन याद्वारे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील कनिष्ठ लिपिक- टंकलेखक या पदावरील सेवा प्रवेश विनियमित करणारे पुढील नियम करीत आहे, या कायदाच्या कलम १८४ च्या उप कलम (३) द्वारे आवश्कतेनुसार महाराष्ट्र शासनाने नियमाचा खालील मसुदा तयार करण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. त्यामुळे प्रभावित होण्याची शक्यता असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीसाठी सदर मसुदा प्रकाशित करण्यात येत आहे; आणि याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, सदर मसुदा २९ जानेवारी २०२६ या तारखेला किंवा त्यानंतर महाराष्ट्र शासन विचारात घेईल.

२. उपरोक्त तारखेपूर्वी सदर मसुदा नियमांबाबत कोणत्याही व्यक्तीकडून अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२ यांना प्राप्त होणारे आक्षेप किंवा सूचना शासनास योग्य वाटल्यास विचारात घेतल्या जातील.

### सेवा प्रवेश नियमाचे प्रारूप

१. या नियमांना, महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्रविकास प्राधिकरणातील कनिष्ठ लिपिक- टंकलेखक (सेवाप्रवेश) नियम, २०२६ असे म्हणावे.

२. नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,

(अ) “शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन असा आहे.

(ब) “विभाग” याचा अर्थ महाराष्ट्र शासनाचा गृहनिर्माण विभाग असा आहे.

(क) “प्राधिकरण" म्हणजे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महा. २८) याच्या कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण.

(ड) “पदवी” याचा अर्थ सांविधानिक विद्यापीठाची कोणत्याही शाखेतील किंवा शासनाने त्याच्याशी समतुल्य म्हणून घोषित केलेली अन्य कोणतीही अर्हता.

(ई) “पदोन्नतीसाठी पात्रता” म्हणजे शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले नियम किंवा आदेशाव्दारे निर्दीष्ट केलेल्या अटी आणि शर्ती नुसार पदोन्नतीसाठी पात्रता.

(इ) “शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र” याचा अर्थ महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे किंवा महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाच्या शासकीय परीक्षा मंडळाचे टंकलेखनाचे किंवा संगणक टंकलेखनाचे प्रमाणपत्र असून, यात शासनाने या प्रयोजनार्थ मान्यता दिलेल्या प्रमाणपत्राचा समावेश होतो.

(उ) “गट-ड” याचा अर्थ महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील वर्ग-४ किंवा गट-ड ;

३. प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील कनिष्ठ लिपिक-टंकलेखक या पदावरील नियुक्ती प्राधिकरणामध्ये पुढील मार्गाने करण्यात येईल :—

(अ) पुढील उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे ;

(एक) वयोमर्यादा :- ज्या उमेदवाराचे वय १९ वर्षापेक्षा कमी नसेल, आणि खुल्या वर्गातील उमेदवारासाठी ३८ वर्षापेक्षा जास्त नसेल व मागासवर्गीय व्यक्तींसाठी ४३ वर्षापेक्षा जास्त नसेल; आणि

(दोन) ज्या उमेदवाराने पदवी धारण केली आहे; आणि

(तीन) ज्यांनी मराठी टंकलेखनाचे किमान ३० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे किंवा इंग्रजी टंकलेखनाचे किमान ४० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र किंवा संगणक टंकलेखनाचे प्रमाणपत्र धारण केले आहे ;

किंवा

(ब) प्राधिकरणाच्या आस्थापनेवर गट-ड मधील पद धारण करणाऱ्या व ज्या कर्मचाऱ्याने किमान ३ वर्षाची नियमित सेवा पुर्ण केलेल्या व वरील खंड (अ) च्या उपखंड (दोन) व (तीन) मध्ये विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या व्यक्तींमधून पात्रता व सेवा ज्येष्ठतेच्या आधारे या निकषावर योग्य अशा व्यक्तीस पदोन्नती देऊन;

किंवा

(क) अनुकंपा तत्त्वावर निवड करण्यासाठी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांनुसार खंड (अ) च्या उपखंड (दोन) व (तीन) मध्ये विहित केलेली अर्हता धारण करीत असलेल्या उमेदवाराची अनुकंपा तत्त्वावर नियुक्तीने;

किंवा

(ड) गट-क मधील वाहनचालक या पदावर किमान ३ वर्षांपेक्षा कमी नाही इतकी नियमित सेवा पूर्ण केलेल्या व खंड (अ) च्या उपखंड (दोन) व (तीन) मध्ये विहित केलेली अर्हता धारण करीत असलेल्या व कनिष्ठ लिपिक- टंकलेखक या पदावर येण्यास इच्छुकता दिलेल्या व्यक्तींमधून, पात्रता व सेवा ज्येष्ठतेच्या आधारे या निकषावर योग्य अशा व्यक्तीस कायमस्वरूपी संवर्ग बदलीने नियुक्ती देता येईल. वाहनचालक या पदावरून नियुक्ती दिलेल्या व्यक्तींची कनिष्ठ लिपिक-टंकलेखक पदावरील सेवाज्येष्ठता कनिष्ठ लिपिक-टंकलेखक पदावरील नियुक्तीच्या दिनांकापासून निश्‍चित करण्यात येईल.

४. नियम ३ येथे नमूद पदावर पदोन्नतीने, अनुकंपा तत्त्वावरील नियुक्तीसह नामनिर्देशनाने व वाहनचालकामधून कायमस्वरूपी बदलीने करावयाच्या नियुक्ती यांचे प्रमाण ४०:५०:१० असे राहील.

परंतु असे की, पदोन्नतीने किंवा वाहनचालकामधून कायमस्वरूपी बदलीने नियुक्तीसाठी विहित अर्हता धारण करणारे उमेदवार उपलब्ध नसल्यास, नियुक्ती प्राधिकाऱ्यांना पदोन्नतीचे व वाहनचालकामधून कायमस्वरूपी बदलीचे प्रमाण शिथिल करून उमेदवारांची नामनिर्देशनाने नियुक्ती करता येईल.

५. नियम ३ येथे नमूद पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार, विभागीय परीक्षा (आवश्यक असल्यास), उत्तीर्ण केली नसेल किंवा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून त्या व्यक्तीला सूट मिळाली नसेल तर, त्या व्यक्तीने सदर परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

६. नियम ३ येथे नमूद पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार, हिंदी व मराठी भाषा परीक्षा, अगोदरच उत्तीर्ण केलेल्या नसतील किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून त्या व्यक्तीला सूट मिळाली नसेल, तर त्या व्यक्तीने सदर परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील.

७. नियम ३ येथे नमूद पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक संचलन प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

८. लहान कुटुंबाची घोषणा :—

(एक) नियम ३ येथे नमूद पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंब घोषणा) नियम, २००५ किंवा शासनाने वेळोवेळी केलेल्या इतर कोणतेही नियम, आदेश किंवा कोणत्याही दस्तऐवजानुसार लहान कुटुंबाची घोषणा करणे आवश्यक राहील.

(दोन) ज्या व्यक्तीला लहान कुटुंबाची घोषणा करतांना दोन पेक्षा जास्त अपत्य असतील अशी व्यक्ती नियुक्तीस अपात्र ठरविण्यात येईल.

(तीन) एखाद्या व्यक्तीची सेवेत नियुक्ती झाल्यानंतर नियुक्तीच्या वेळी किंवा नियुक्ती झाल्यानंतर त्याला दोन पेक्षा जास्त अपत्य असल्याचे सिध्द झाल्यास, तो सदर पदावर राहण्यास अपात्र ठरेल.

९. नियम ३ येथे नमूद पदावर नियुक्त झालेला व्यक्ती प्राधिकरणाच्या अधिपत्याखालील, महाराष्ट्र राज्यात कोणत्याही मंडळात / कार्यालयात, बदलीस पात्र राहील.

१०. नियम ३ येथे नमूद पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीला प्राधिकरणाच्या सेवेत नियुक्तीनंतर शासनाने वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या अटी आणि शर्ती लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अजित कवडे,**
शासनाचे उप सचिव.

## HOUSING DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 22nd January 2026.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA HOUSING AND AREA DEVELOPMENT ACT, 1976.

No.SEPRANI-2020/C.R.88/GRUNIBHU.—The following draft of rules which the Government of Maharashtra proposes to make in exercise of the powers conferred by clause (*i*) of sub-section (*2*) of section 184 read with sub-section (*5*) of section 19 of the Maharashtra Housing and Area Development Act, 1976 (Mah. XXVIII of 1977), and of all other powers enabling it in that behalf, and in supersession of all the existing rules, notifications, orders or any other instruments issued in this behalf to regulate recruitment to the post of Junior Clerk on the establishment of the Maharashtra Housing and Area Development Authority, is hereby published, as required by sub-section (*3*) of section 184 of the said Act, for the information of all the persons likely to be affected thereby; and a notice is hereby given that the said draft will be taken into consideration by the Government of Maharashtra on or after the 29th of January 2025.

2. Any objection or suggestions, which may be received by the Additional Chief Secretary, Housing Department, Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mumbai 400 032, from any person with respect to the said draft rules before the aforesaid date, will be considered by the Government.

## DRAFT RULES

1. These rules may be called the Junior Clerk, Maharashtra Housing and Area Development Authority (Recruitment) Rules, 2026.

2. In these rules, unless the context requires otherwise,-

(*a*) "Authority" means the Maharashtra Housing and Area Development Authority established under section 3 of Maharashtra Housing and Area Development Act, 1976 (Mah. XXVIII of 1977);

(*b*) "Department" means Housing Department of Government of Maharashtra;

(*c*) "degree" means a degree of any discipline of a statutory university or any other qualification declared by the Government to be equivalent thereto;

(*d*) "eligibility for promotion" means the eligibility for promotion in accordance with the terms and conditions specified for promotion in rules, resolutions or orders issued by the General Administration Department, from time to time;

(*e*) "Government" means the Government of Maharashtra;

(*f*) "Government Commercial Certificate" means a certificate in typing or computer typing issued by the Maharashtra State Examination Council or the Government Examination Board of the Education Department, Government of Maharashtra; and includes a certificate issued by any other institution recognized by the Government for this purpose;

(*g*) "Group-D" means "Class-4 or Group-D" on the premises of the Maharashtra Housing And Area Development Authority.

3. Appointment to the post of Junior Clerk on the establishment of the Authority, shall be made,-

(1) by nomination from amongst the candidates who fulfils the following criteria, namely:—

(*i*) *Age limit.*—

(A) *Lower Age Limit.*—Nineteen years of age completed as on the last date of receipt of applications as per advertisement for recruitment to the said post.

(B) Upper Age Limit.- Does not exceed thirty-eight years of age for the persons not belonging to reserved categories and forty-three years of age for the persons belonging to reserved categories as on the last date of receipt of application as per advertisement for recruitment to the said post.

(*ii*) *Minimum Educational Qualification.—*

(*a*) A person holding a degree from a recognized university; and

(*b*) A person holding a Government Commercial Certificate or Computer Typing Certificate with a typing speed of at least thirty words per minute in Marathi or with typing speed of at least forty words per minute in English.

(2) by promotion of a suitable person having eligibility for promotion, on the basis of seniority, from amongst the persons holding the post of Group-D on the establishment of the Authority, having not less than three years of regular and continuous service on that post and possessing educational qualification as mentioned in clause (*ii*) of sub-rule (*1*) of this rule; or

(3) on compassionate ground, of a suitable person, in accordance with the orders issued in this behalf by the Government, from time to time, who possess qualifications as mentioned in clause (*ii*) of sub-rule (*1*) of this rule; or

(4) by transfer of a suitable person, on the basis of seniority from amongst the persons holding the post of Driver, Group C, in permanent cadre, in the establishment of the Authority, who shows willingness for the post of Junior Clerk-Typist, Group C and having completed not less than three years of regular service after completion of probation period on the post of Driver and possessing qualifications mentioned in clause (*ii*) of sub-rule (*1*) of this rule. The seniority of the persons appointed from the post of Driver to the post of Junior Clerk-Typist will be determined from the date of appointment to the post of Junior Clerk-Typist.

4. The appointment to the post mentioned in rule 3 by promotion, compassionate grounds and nomination and permanent transfer of Group-C Drivers shall be made in the ratio of 40:50:10.

Provided that, if candidates possessing the prescribed qualifications are not available for appointment by promotion or permanent transfer from the post of driver, the appointing Authority may relax the ratio of promotion and permanent transfer from the post of driver and appoint the candidates by nomination.

5. A person before being appointed to the post mentioned in rule 3 shall be required to pass the Departmental Examination conducted by the Authority if any, unless he has been exempted from passing the same.

6. A person appointed to post mentioned in rule 3 shall pass the Marathi and Hindi languages examinations as per the rules made in that behalf by the Government, from time to time, unless he has already passed or has been exempted from passing those examinations.

7. A person appointed to the post mentioned in rule 3 shall possess Certificate of Computer Operation prescribed by rules or orders issued in that behalf by the Government, from time to time.

8. (*1*) A person appointed to post mentioned in rule 3 by nomination shall submit a declaration of Small Family as per the provisions of the Maharashtra Civil Services (Declaration of Small Family) Rules, 2005 or any other rules, orders or any instruments issued in this behalf by the Government, from time to time.

(*2*) A person having more than two children on the date of submission of Declaration of Small Family shall be disqualified for the appointment in service.

(*3*) After appointment of a person in the service, if it is proved that he has more than two children at the time of appointment or thereafter, then he shall be disqualified for continuing on the said post in service.

9. A person appointed to the post mentioned in rule 3 shall be liable to be transferred to any of the Board Office within the jurisdiction of the Authority in the State of Maharashtra.

10. The terms and conditions specified by the Government, from time to time, shall apply to the person appointed to the post mentioned in rule 3 after his appointment in the service of the Authority.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

AJIT KAWADE,
Deputy Secretary to Government.

## गृहनिर्माण विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०००३२, दिनांक २२ जानेवारी, २०२६.

### अधिसूचना

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६.**

क्रमांक सेप्रनि-२०२०/प्र.क्र.८८/गृनिभू.—महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (१९७७ चा महा. २८) यांच्या कलम १८४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (एक) आणि कलम १९ च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच त्याबाबतीत समर्थ करणाऱ्या सर्व इतर अधिकारांचा वापर करून व याबाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश यांचे अधिक्रमण करून महाराष्ट्र शासन याद्वारे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील सहायक या पदावरील सेवा प्रवेश विनियमित करणारे पुढील नियम करीत आहे, या कायदाच्या कलम १८४ च्या उप कलम (३) द्वारे आवश्यकतेनुसार महाराष्ट्र शासनाने नियमाचा खालील मसुदा तयार करण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. त्यामुळे प्रभावित होण्याची शक्यता असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीसाठी सदर मसुदा प्रकाशित करण्यात येत आहे; आणि याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, सदर मसुदा २९ जानेवारी २०२६ या तारखेला किंवा त्यानंतर महाराष्ट्र शासन विचारात घेईल.

२. उपरोक्त तारखेपूर्वी सदर मसुदा नियमांबाबत कोणत्याही व्यक्तीकडून अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२ यांना प्राप्त होणारे आक्षेप किंवा सूचना शासनास योग्य वाटल्यास विचारात घेतल्या जातील.

### सेवा प्रवेश नियमाचे प्रारूप

१. या नियमांना, महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्रविकास प्राधिकरणातील सहायक (सेवाप्रवेश) नियम, २०२६ असे म्हणावे.

२. नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,

(अ) “शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन असा आहे.

(ब) “विभाग” याचा अर्थ महाराष्ट्र शासनाचा गृहनिर्माण विभाग असा आहे.

(क) "प्राधिकरण" म्हणजे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महा. २८) याच्या कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण.

(ड) “पदवी” याचा अर्थ सांविधानिक विद्यापीठाची कोणत्याही शाखेतील किंवा शासनाने त्याच्याशी समतुल्य म्हणून घोषित केलेली अन्य कोणतीही अर्हता.

(ई) “पदोन्नतीसाठी पात्रता” म्हणजे शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले नियम किंवा आदेशाव्दारे निर्दीष्ट केलेल्या अटी आणि शर्ती नुसार पदोन्नतीसाठी पात्रता.

३. प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील सहायक या पदावरील नियुक्ती प्राधिकरणामध्ये पुढील मार्गाने करण्यात येईल :—

(अ) पुढील उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे ;

(एक) वयोमर्यादा :-ज्या उमेदवाराचे वय १९ वर्षापेक्षा कमी नसेल, आणि खुल्या वर्गातील उमेदवारासाठी ३८ वर्षापेक्षा जास्त नसेल व मागासवर्गीय व्यक्तींसाठी ४३ वर्षापेक्षा जास्त नसेल; आणि

(दोन) ज्या उमेदवाराने पदवी धारण केली आहे; आणि

(तीन) ज्यांना प्रशासकीय कामाचा ५ वर्षापेक्षा कमी नसेल, इतका अनुभव आहे.

किंवा

(ब) प्राधिकरणाच्या आस्थापनेवर वरिष्ठ लिपिक हे पद धारण करणाऱ्या ज्या कर्मचाऱ्याने किमान ३ वर्षाची नियमित सेवा पुर्ण केलेल्या व्यक्तींमधून पात्रता व सेवा ज्येष्ठतेच्या आधारे या निकषावर योग्य अशा व्यक्तीस पदोन्नती देऊन;

४. नियम ३ येथे नमूद पदावर पदोन्नती व नामनिर्देशनाने करावयाची नियुक्ती यांचे प्रमाण ९०:१० असे राहील.

५. नियम ३ येथे नमूद पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार, विभागीय परीक्षा (आवश्यक असल्यास), उत्तीर्ण केली नसेल किंवा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून त्या व्यक्तीला सूट मिळाली नसेल तर, त्या व्यक्तीने सदर परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

६. नियम ३ येथे नमूद पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार, हिंदी व मराठी भाषा परीक्षा, अगोदरच उत्तीर्ण केलेल्या नसतील किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून त्या व्यक्तीला सूट मिळाली नसेल, तर त्या व्यक्तीने सदर परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील.

७. नियम ३ येथे नमूद पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक संचलन प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

